# ग्रंथ प्राप्तीची ठिकाणे

१) 'मधुकरी' वृंदावन कॉलनी, आळंदी देवाची. (जलाराम मंदिराजवळ)
भ्र.ध्व. ९३७३०७७७१०/ ९७६३३२७७९६/ ९६२३८१३०४८ /८०८०३७२७५२
२) ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिर, ग्रंथ विक्री केंद्र. आळंदी देवाची. फोन-०२१३५-२३३२२२.
४) ह.भ.प. रमणलाल भंडारी-'साजन सजनी' नवीपेठ, अहमदनगर भ्र. ध्व. ९८९०९०१६६३.
५) ह.भ.प. वसंत सुंबरे, 'श्रॉफ भवन' रूम नं. ८ (मजीद स्टेशन जवळ) पी. डी. मेलो रोड, कर्नाक बंदर, मुंबई. भ्र. ध्व. ९३२२९२६९१०.

(पोस्टाने ग्रन्थ मागविण्याची सुविधा उपलब्ध आहे. वरील दुरध्वनी क्रमांकाशी संपर्क करा.)

**अक्षर जुळणी** - ह.भ.प. हौशाराम आनंदराव पऱ्हाड (B.Sc. B.Ed.)
सेवानिवृत्त उपप्राचार्य, श्री वाघेश्वर विद्यालय चऱ्होली बु।।.
भ्र.ध्व. ९१७५९२५८९५.

**मुखपृष्ठ सजावट** - श्री. अनिल गटले.

**सातवी आवृत्ती - २०००/ प्रती** (एकूण प्रती १४०००)

**प्रकाशन - श्रीतुकोबाराय वैकुंठगमन सोहळा - बीज**
(फाल्गुन कृ.२ शके - १९४५ बुधवार दि. २७/३/२०२४)

**प्रथमावृत्ती** – २०००/प्रती (आश्विन शु.९ शके १९३५, विजया दशमी. दिनांक १३/१०/२०१३)
**द्वितीयावृत्ती** - २०००/ प्रती (आश्विन शु.९ शके १९३७, विजया दशमी. दिनांक २२/१०/२०१५)
**तृतीयावृत्ती** – २०००/-प्रती (आश्विन शु.९ शके १९४२, विजया दशमी. दिनांक २५/१०/२०१८
**चतुर्थावृत्ती** -२०००/ प्रती - (आषाढ वद्य एकादशी, कामिका एकादशी, १६ जुलै २०२०)
**पंचमावृत्ती - २०००/**
**सहावी आवृत्ती-** २०००/ प्रती (कार्तिक वद्य एकादशी, (३० नोव्हेंबर २०२१)

**प्रकाशक** - आनंदाश्रम प्रकाशन, आळंदी देवाची.

© सर्व हक्क प्रकाशकाच्या अधीन आहेत.

**मुद्रक** - प्रशांत झनझने, झेड कॅपिटल, सांगवी, पुणे. (मो. ९३७३१०९८८९)

मुल्य -

# * संपादकीय *

'**इवलेसे रोप**' ह्या ज्ञानेशोक्तीला अनुसरून गंभीर आध्यात्मिक आशयाची अभिव्यक्ती व अभिरुची समाजपुरुषात प्रचरित व प्रवाहित व्हावी हे एकमेव उदात्त व अननुदार उद्दिष्ट हृदयस्थ स्थानापन्न करून स्वबुद्धीतील भ्रम-प्रमादादी दोषांद्वारा वास्तविक मूलभूत अक्षरवाङ्मयाचे यत्किंचितहि अतिक्रमण न होता यथामति यथाशक्ति केवळ शास्त्ररहस्याचा त्यांच्या प्रातिभ अनुभूतीच्या माध्यमातून भगवदिच्छेने आणि त्यांच्या अंतःकरणात नित्य-निरंतर वसत असलेल्या करुणेने अथवा दयेने चराचर विश्वाला पावन व पुनीत करणाऱ्या अन्य भाषीय दैवी वाणीला मराठी सारस्वतात अनुवादित करून आपल्या मायभाषेची आजीवन सेवा करण्याच्या भगवत्प्रेरीत उत्कट इच्छेपोटी त्या ब्रह्मविद्येच्या सुकाळाविषयी की, जिच्या गर्भात अनेक सिद्धांतरत्ने व शब्दरत्ने निहित आहेत; त्यातीलच काही वेचक मण्यांच्याद्वारा आपल्या भाषास्वरूप मातेला अलंकृत करण्याच्या यत्नरूपी सेवेचे पर्यवसित फल म्हणजे आज प्रकाशित होत असलेला अनेक पाठभेद व अर्थनिर्णायक शब्दकोशासहित 'श्री आनंदाश्रम प्रकाशना'च्या पंचवीस वर्षाच्या आयुर्मानातील हा षोडश क्रमांकाचा आकर ग्रंथ '**श्रीमद्भगवती ज्ञानेश्वरी**' म्हणजेच '**भावार्थदीपिका!**' ग्रंथाची सहावी आवृत्ती भगवान् संतसम्राट् माऊलींनी स्वतः ज्यांना ह्या प्रस्तुत ग्रंथाच्या संशोधन कार्यासाठी अनुग्रहपूर्वक प्रेरणा केली; असे भगवदावतार महावैष्णव शांतिब्रह्म श्रीएकनाथ महाराज '**ब्रह्मसाम्राज्यदीपिका**' अशा रसाळ व अलंकारिक भाषेत तोंड भरून प्रस्तुत ग्रंथाचे वस्तुनिष्ठ माहात्म्य वर्णन करतात; सद्यकालीन अकराळ-विकराळ कलिकाळाने ग्रस्त व दुःखाकुल समाजपुरुषासाठी विश्वातील उपलब्ध तत्त्वज्ञानांच्या अनेक सरणीमध्ये 'अपौरुषेय वेदाच्या' अभिप्रायाला परिपूर्णपणे अनुसरणाऱ्या आपल्या स्वानुभूतीच्या आधारे उपोद्बलक अशा अनेक उपपत्तींच्याद्वारा समृद्ध, संपूर्ण विश्वातील मानवमात्राला परमशांति आणि परमसौख्याचा लाभ करवून देण्यासाठी कैवल्याचा पुतळा, शांतिचा जिव्हाळा, केवल चैतन्यस्वरूप परमात्माच सख्यत्वाच्या भावनेने ओतप्रोत आणि मूर्तिमान होऊन दुःखाच्या गर्तेतून मानवमात्राचे उद्धरण करून समाजजीवनाला अनंत सुखसागरामध्ये नित्यनिरंतर निमज्जन करविण्यासाठी ह्या अवनीतलावर अवतीर्ण झाला.

सात शतकाहूनहि अधिक काळ अनेक महापुरुषांनी ह्या तत्त्वज्ञानाची अनन्यनिष्ठापूर्वक कास धरून जे अत्युच्च कोटीच्या महासुखाला अर्थात् ब्रह्मसुखाला प्राप्त झाले; स्वप्नात देखील त्यांना दुःखप्रतीति येईनासी झाली. अशा प्रकारे जीवन्मुक्तीच्या विलक्षण सुखाचा नित्यनूतन वर्धमान भोग भोगून प्रारब्धलेशाच्या परिसमाप्तीच्या अंती जे विदेहकैवल्याला प्राप्त झाले; अशा अलौकिक, दिव्य, तत्त्वज्ञानाचे सूत्ररूप; परंतु आत्मस्वरूपामध्ये निःसन्देह अवस्थान करविणारे असे हे सर्वतन्त्र स्वतन्त्र पृथ्वीच्या पाठीवरील अभूतपूर्व दर्शनशास्त्र म्हणजे हे '**श्रीज्ञानेश्वर दर्शन**' श्रीज्ञानेश्वरीच्या रूपाने मराठी सारस्वतात तेजःपुंज ध्रुवताऱ्याच्या स्थानी निष्ठावान वारकरी

# अथ ध्यानम्

**ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं**
**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।**
**अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी–**
**मम्ब त्वामनुसन्दधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥१॥**

**अर्थ** – हे माते भगवद्गीते, भगवान् नारायणांनी स्वतः अर्जुनाला उपदेशिलेली प्राचीन मुनि व्यासांनी महाभारतामध्ये ग्रथित केलेली अद्वैतरूप अमृताचा वर्षाव करणारी संसाराचा द्वेष म्ह० उच्छेद करणारी जिचे अठरा अध्याय आहेत, अशी पूज्य गीता अशा तुज गीतेचें मी चिंतन–स्मरण करितो.

**नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।**
**येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः॥२॥**

**अर्थ** – फुललेल्या कमलपत्राप्रमाणे ज्यांचे आकर्णनेत्र आहेत, ज्यांची बुद्धी विशाल आहे, अशा हे व्यासमुने! ज्या तुम्ही भारतरूपी तेलाने भरलेला ज्ञानप्रचुर दीप प्रदीप्त केलात, त्या तुम्हांला नमस्कार असो. २.

**प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।**
**ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः॥३॥**

**अर्थ** – शरणागतास कल्पवृक्षाप्रमाणे असलेल्या – ज्याच्या एका हातात चाबकाची काठी आहे; ज्याने ज्ञानाची मुद्रा धारण केली आहे अशा गीतामृताचे दोहन करणाऱ्या श्रीकृष्णाला नमस्कार असो. ३.

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।**
**पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥४॥**

**अर्थ**– सर्व उपनिषदे याच गाई, नंद गोपालाचा पुत्र हा दोहन करणारा – गवळी पार्थ हे वासरू, गीतेचे अनुष्ठान करणारा बुद्धिमान् जीव हा अमृत प्राशन करणारा भोक्ता, त्याच्यासाठी मोक्षासारखे श्रेष्ठ फल देणाऱ्या गीतामृताचे दोहन केले. (उपनिषद्रूपी गाईंपासून पार्थरूपी जीवासाठी अंतर्यामी नारायणाने गीतामृताचे दोहन केले. ) ४.

**वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।**
**देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥५॥**

**अर्थ –** वसुदेवाचा पुत्र कंस व चाणूर यांना मारणारा, देव देवकीचा परम आनंद अशा सर्व जगताच्या धर्मोपदेशक श्रीकृष्णाला मी वंदन करितो. ५.

**भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गान्धारनीलोत्पला**
**शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला**
**अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी**
**सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः॥६॥**

**अर्थ** – भीष्म व द्रोण हे ज्या रणनदीचे दोन तीर आहेत, जयद्रथ हे जिच्यांतील जल आहे,

# ।। श्रीज्ञानेश्वरी ।।

## अध्याय पहिला

।। श्रीगणेशाय नमः ।।

**ॐ नमो जी आद्यां[१] । वेदप्रतिपाद्या[२] ।**
**जय जय स्वसंवेद्यां[३] । आत्मरूपा ।।१।।**
**देवा, तूंचि गणेशु । #सकलार्थमतिप्रकाशु[४] ।**
**म्हणे निवृत्तिदासु । अवधारीजो[५] जी ।।२।।**
**हें शब्दब्रह्म[६] अशेष[७] । तेचि मूर्ति सुवेष[८] ।**
**जेथ[९] वर्णवपु[१०] निर्दोष[११]। मिरवत[१२] असे ।।३।।**
**स्मृती[१३] तेचि अवयव । *देखा आंगीक[१४] भाव ।**
**तेथ लावण्याची ठेव[१५]। अर्थशोभा ।।४।।**
**अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें ।**
**पदपद्धति खेवणें[१६]। प्रमेयरत्नांचीं[१७] ।।५।।**
**पदबंध[१८] नागर[१९]। तेंचि रंगाथिलें[२०] अंबर[२१]।**
**जेथ साहित्य[२२] वाणें[२३] सपूर[२४]। उजाळाचें[२५] ।।६।।**
**देखा काव्यनाटका । जे निर्धारिता सकौतुका ।**
**त्याची रुणझुणती क्षुद्रघंटिका[२६]। अर्थध्वनि[२७]।।७।।**
**नाना प्रमेयांचि परी । निपुणपणें पाहतां कुसरी[२८]।**
**दिसती उचित[२९] पदें माझारीं । रत्नें भलीं ।।८।।**
**तेथ व्यासादिकांचिया मतीं । तेचि मेखळा[३०] मिरवती ।**
**चोखाळपणें[३१] झळकती । पल्लवसडका[३२]।।९।।**
**देखा, षड्दर्शनें[३३] म्हणिपती[३४]। तेचि भुजांची आकृती ।**
**म्हणऊनि विसंवादें[३५] धरिती । आयुधें[३६] हातीं ।।१०।।**
**तरी तर्कु[३७] तोचि ●फरशु[३८]। नीतिभेदु[३९] अंकुशु ।**
**वेदान्तु तो महारसु[४०] । मोदकु मिरवे[४१] ।।११।।**
**एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु[४२] ।**
**तो बौद्धमतसंकेतु[४२] । αवार्तिकांचा[४३] ।।१२।।**

१ सर्वांचे आद्य कारण(परमात्मा), विवर्तोपादान कारण. २ वेदांचा प्रतिपाद्य विषय. ३ स्वतः स्वतःसच अविषय असणाऱ्या(सु+असंवेद्य). ४ सर्व विषय आणि बुद्धीचा प्रकाशक. ५ ऐकावे, श्रवण करावें. ६ वेद. ७ संपूर्ण. ८ चांगला वेष परिधान करणारा. ९ ज्या मूर्तीच्या ठिकाणी १० अक्षररूप अंग-शरीर. ११ दोषरहित. १२ विलसत. १३ मन्वादि स्मृती. १४ शरीराचे १५ ढब, ठेवण. १६ कोंदणें. १७ तत्त्वार्थाचीं सिद्धांतरूपी रत्नें १८ पदलालित्य. १९ उत्तम. २० रंगविलेलें. २१ वस्त्र. २२ रसालंकारशास्त्र. २३ प्रकार, वानगीदाखल, मासलेदार. २४ बारीक, तलम. २५ प्रकाशमान. २६ घागऱ्या, लहान घंटा, पैंजण, वाळे. २७ व्यंग्यार्थरूप ध्वनी. २८ कुशलता. २९ योग्य. ३० कमरपट्टा,कडदोरा,दुपट्टा, शेला. ३१ स्वच्छ-पणानें. ३२ पदराचे अग्रभाग,सोगा,दशा. ३३ पातंजल, सांख्य, वैशेषिक, न्याय, मीमांसा, आणि वेदान्त ही सहा दर्शनें. (अथवा ↓) ३४ म्हटलीं जातात. ३५ निरनिराळी परस्पर विरोधी मतांतरे. ३६ हत्यारें. ३७ न्यायशास्त्र ३८ मोठी कुऱ्हाड. ३९ वैशेषिक दर्शन. ४० ब्रह्मरसानें भरलेला, अतिसुरस. ४१ शोभून दिसतो.
४२ तुटलेला, अपूर्ण, बौद्ध मताचे निदर्शक चिन्ह. ४३ तंत्रवार्तिक, श्लोकवार्तिक ह्या पूर्व मीमांसा दर्शनानें व सुरेश्वराचार्यांच्या वेदान्त सूत्रानुसारी उपनिषद् व तर्काद्वारा खण्डन केलेला.

(#सकलमतिप्रकाश, सकल मथितार्थ, सकलार्थप्रकाश.) *रेखा. ●परशु. (३३ 'सौरं च वैष्णवं शाक्तं शैवं वैनायकं तथा । स्कांदं च शक्तिमार्गश्च दर्शनानि षडेव हि ।।.) αचार्वाकांचा.

**इष्ट मित्र आपुले । कुमरजन देखिले ।**
**हे #सकळ असती आले । तयांमाजी ।।८१।।**
[d]**सुहृज्जन[१] सासरे ।** [e]**आणीकही सखे सोइरे ।**
**कुमर, पौत्र[२] धनुर्धरें । देखिले तेथ ।।८२।।**
**जयां उपकार होते केले । कीं, आपदीं [३] जे रक्षिले ।**
**हे असो; वडील Δधाकुले[४] । आदिकरूनि ।।८३।।**
[f.]**ऐसें गोत्रचि दोहीं दळीं । ●उद्यत[५] जालें असे कळीं[६] ।**
[g.]**हें अर्जुनें तिये वेळीं । अवलोकिलें ।।८४।।**

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

गीताई-अत्यंत करुणा-ग्रस्त विषादें वाक्य बोलिला।

[a]**तेथ मनीं गजबज[७] जाहली । आणि अपैसी[८] αकृपा[९] उपजली।**
**तेणें अपमानें[१०] निघाली । वीर-वृत्ति[१०] ।।८५।।**
**जिया[११] उत्तम कुळींचिया होती । आणि δगुणलावण्य[१२] आथी[१३]।**
**तिया[१४] आणिकीतें न साहती । सुतेजपणें[१५] ।।८६।।**
**नविये[१६] आवडीचेनि भरें । कामुक[१७] निज-वनिता[१८] विसरे ।**
**मग पाडेंवीण[१९] अनुसरे । भ्रमला जैसा ।।८७।।**
**कीं, तपोबळें[२०] ऋद्धी[२१] । पातलिया[२२], भ्रंशे बुद्धी ।**
**Δमग तया विरक्ततासिद्धी[२३] । λआठवेना ।।८८।।**
**तैसें अर्जुना तेथ जाहलें । असतें[२४] पुरुषत्व[२५] गेलें ।**
**जे, अंत:करण दिधलें । कारुण्यासी[२६] ।।८९।।**
**देखा, मंत्रज्ञु बरळु[२७] जाय[२७] । मग तेथ कां जैसा संचारु[२८] होय ।**
**तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला[२९] ।।१९०।।**
**म्हणौनि, असतां धीरु गेला । हृदया πद्रावो[३०] आला ।**
**जैसा μचंद्रकळीं[३१] शिवतला[३२] । सोमकांतु[३३] ।।९१।।**
**तयापरी पार्थु । अतिस्नेहें मोहितु ।**
[b]**मग सखेद[३४] असे बोलतु । श्रीअच्युतेसी[३५] ।।९२।।**

अर्जुन उवाच

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ।।२८।।
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ।।२९।।

(d.श्वशुरानिति) १ मित्र, स्नेही.
(e सर्वानिति)
२ नातू.
३ संकटसमयी.
४लहान.
(f सेनयोरिति) ५ उत्सुक, तयार, प्रवृत्त. ६ युद्धांस, कलहास.
(g तानिति)

(a कृपया परयाविष्ट:)
७ गडबड, घालमेल. ८ आपोआप. ९ करुणा. १० तो अपमान न सोसून वीरवृत्ति(शौर्य) अर्जुनाला सोडून निघाली. ११ ज्या स्त्रिया. १२ सद्गुण व सौंदर्यसंपन्न. १३ आहेत. १४ त्या. १५ आपल्या आंगच्या सौंदर्यादि गुणांच्या तेजानें. १६ नव्या. १७ विषयी. १८ आपली स्त्री. १९ योग्यतेवांचून. २० तपश्चर्येच्या जोरानें. २१ संपत्ति. २२ प्राप्त झाली असतां. २३ वैराग्य.
२४ असलेलें. २५ पराक्रम, शौर्य.
२६ दयेला. २७ मंत्रोच्चारांत प्रमाद.
२८ पाठांतरातील दोष.
२९ आकर्षिला, व्यापला गेला

३० दयेचा पाझर.
३१ चंद्राच्या किरणांनीं. ३२ स्पर्शिला. ३३ चंद्रकांतमणि.
(b.विषीदन्निदमब्रवीत्)
३४ दु:खयुक्त. ३५ कृष्णाशीं.

#शालक. Δधाकुटे.●उदित. αकृपा आली. δगुणलावण्यें. Δमग विरक्तता, विरक्तां. λनाठवे ती. πद्राव. μचंद्रकिरणी शिंपिला, चंद्र किरणी.

# अध्याय दुसरा

सञ्जय उवाच

गीता- तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदन: ।।१।।

गीताई-असा तो करुणा-ग्रस्त घाबरा अश्रु गाळित।
करीत असतां खेद त्यास हें कृष्ण बोलिला।।१।।

**aमग संजयो म्हणे रायातें । b'आइके, तो पार्थु तेथें ।**
**cशोकाकुल[१] रुदनातें, । करितु[२] असे' ।।१।।**
**तें कुळ देखोनि समस्त । dस्नेह उपनलें[३] अद्‌भुत[४] ।**
**तेणें द्रवलें[५] असे चित्त । कवणे[६] परी[६]?।।२।।**
**जैसें लवण[७] जळें झळंबलें[८] । नातरी, अभ्र[९] वाते[१०] हाले ।**
**तैसें, सधीर[११] परी विरमलें[१२] । हृदय तयाचें ।।३।।**
**म्हणौनि कृपा[१३] आकळिला । eदिसतसे अति कोमाइला![१४] ।**
**जैसा कर्दमीं[१५] रुपला[१६] । राजहंस ।।४।।**
**तयापरी तो पंडुकुमरु । महामोहें[१७] अति जर्जरु[१८] ।**
**देखोनि, श्रीशार्ङ्गधरु[१९] । काय बोले ।।५।।**

(a सञ्जय उवाच) (b तं तथा) (c अश्रुपूर्णाकुलेक्षणं) १ शोकानें-दयेने व्याप्त. २ करिता झाला. (d कृपयाविष्टं) ३ उपजलें. ४ अपूर्व, विलक्षण. ५ विरघळलें. ६ कशा रीतीनें. ७ मीठ. ८ विरघळलें. ९ ढग. १० वाऱ्यानें. ११ धैर्ययुक्त. १२ विरघळलें. १३ ममतेनें. (e.विषीदंतमित्यर्थं) १४ म्लान झालेला. १५ चिखलांत. १६ रूतून बसला, गुंतून गेला, फसला. १७ कार्या सहित असणारा अविवेक. १८ ग्रस्त. १९ शार्ङ्ग नावाचे धनुष्य धारण करणारा-श्रीकृष्ण.

श्रीभगवानुवाच

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ।।२।।

गीताई-कोठूनि भलत्या वेळीं सुचलें पाप हें तुज ।
असें रुचे न थोरांस ह्यानें दुष्कीर्ति दुर्गति।।२।।

**aम्हणे, 'अर्जुना, आदि पाहीं[२०] । हें उचित काय इये[२१] ठायीं?।**
**तूं कवण? हें कायी । करीत आहासी[२२]?।।६।।**
**तुज, सांगे, काय जाहलें?। कवण उणें[२३] आलें?।**
**करिता, काय ठेलें[२४]?। खेदु कायिसा[२५]?।।७।।**
**तूं अनुचिता[२६] चित्त नेदिसी[२७] । धीरु #कहीं न[२८] संडिसी[२८] ।**
**तुझेनि नामें, ✻अपयशीं[२९] । दिशा ●लंघिजे![३०] ।।८।।**
**तूं शूरवृत्तीचा ठावो[३१] । क्षत्रियांमाजीं रावो ।**
**तुझिया लाठेपणाचा[३२] आवो[३३] । तिहीं लोकीं ।।९।।**

(a.श्रीभगवानुवाच-कुतस्त्वा) २० विचार कर. २१ ह्या जागीं (युद्धस्थानी) २२ आहेस. २३ कमी. २४ राहिलें. २५ कशाकरितां. २६ अयोग्य गोष्टीला. २७ देणारा नव्हेस. २८ सोडणारा नव्हेस. २९ अपयशानें. ३० उल्लंघावी. ३१ स्थल, ठिकाण. ३२ शौर्याचा. ३३ प्रतिष्ठा, डौल, दबदबा.

#कांहीं. ✻आपैशीं, अपेशीं. ●लंघीजे.

# अध्याय तेरावा

**#आत्मरूप गणेशु केलिया स्मरण[१] । होय सकळ विद्यांचें अधिकरण[२]। *तेचि वंदूं श्रीचरण[३] । श्रीगुरूंचे ।।१।।**
**जयांचेनि आठवें । शब्दसृष्टि[४] आंगवें[५] ।**
**सारस्वत[६] आघवें । जिव्हेसि ये ।।२।।**
**वक्तृत्व गोडपणें । अमृतातें ●पारुखें[७] म्हणे ।**
**रस होती αवोळंगणें[८] । अक्षरांसीं ।।३।।**
**भावाचें[९] अवतरण[१०] । δअवतरविती[११] निजखूण[१२] ।**
**हाता[१३] चढे[१३] संपूर्ण । Δतत्त्वबोध ।।४।।**
**श्रीगुरूंचे पाय । जैं हृदय गिंवसूनि[१४] ठाय[१४] ।**
**तैं एवढें भाग्य होय । उन्मेखासी[१५] ।।५।।**
**ते नमस्कारूनि आतां । जो पितामहाचा[१६] पिता[१६] ।**
**लक्ष्मीयेचा भर्ता । ऐसें म्हणे ।।६।।**

१ चिंतन, ध्यान. २ आश्रयस्थान. ३ चरणरज, चरणतीर्थ, स्वरूप. ४ वाचाबळ, कविताशक्ति. ५ प्राप्त होते, स्वाधीन होते. ६ विद्या.
७ शिळें, फिके.
८ आश्रयभूत, शरण जाऊन, सेवा करतात. ९ अभिप्रायाचें, गर्भित-अर्थाचें. १० आगमन. ११ प्रकट करिते. १२ अनुभवखूण. १३ स्वाधीन होतो. १४ धरून राहते, पोटाळून राहते. १५ विचाराला, ज्ञानाला,बुद्धिला, ज्ञानासहित. १६ ब्रह्मदेवाचा पिता, श्रीकृष्ण.

श्रीभगवानुवाच

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।
एतद्यो वेत्ति तं प्राहु: क्षेत्रज्ञ इति तद्विद: ।।१।।

गीताई-अर्जुना ह्या शरीरास म्हणती क्षेत्र जाणते ।
जाणे हें क्षेत्र जो त्यास क्षेत्रज्ञ म्हणती तसें।।

**aतरी पार्था परिसिजे । देह हें क्षेत्र[१७] म्हणिजे ।**
**bजो हें जाणे; तो बोलिजे । क्षेत्रज्ञु[१८] एथें ।।७।।**

a(श्रीभगवानुवाच-इदमिति) १७ शेत. b(क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि) १८ क्षेत्राला जाणणारा, जीव.

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ।।२।।

गीताई-क्षेत्रज्ञ मी चि तो जाण क्षेत्रांत सगळ्या वसें।
क्षेत्र-क्षेत्रज्ञ -भेदास जाणणें ज्ञान मी म्हणें।।२।।

**cतरी क्षेत्रज्ञु जो एथें । तो मीचि; जाण निरुतें[१९] ।**
**dजो सर्व क्षेत्रातें । संगोपोनि[२०] असे ।।८।।**
**eक्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें । जाणणें जें निरुतें ।**
**fज्ञान ऐसें तयातें । मानूं आम्ही ।।९।।**

c(क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि) १९खरें, यथार्थ, जसे आहे तसे. d(सर्वक्षेत्रेषु भारत) २० पोषण करीत आहे. e(क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं) f(यत्तज्ज्ञानं मतं मम)

#जयांचे. *ते वंदूं श्रीचरण. ●पारुष. αवोळगणे. δअवतरविती खूण. Δतत्त्वभेद.

# अध्याय अठरावा

जयजय देव निर्मळ । निजजनाखिलमंगळ[१] ।
जन्मजराजलदजाळ[२]–। प्रभंजन[३] ।।१।।
जयजय देव प्रबळ । विदळितामंगळकुळ[४] ।
निगमागमद्रुमफळ[५]–। फलप्रद[५] ।।२।।
जयजय देव सकल । विगतविषयवत्सल[६] ।
कलितकाळकौतूहल[७] । कलातीत ।।३।।
जयजय देव निश्चळ । चलितचित्तपानतुंदिल[८] ।
जगदुन्मीलनाविरल[९] । केलिप्रिय[१०] ।।४।।
जयजय देव निष्कळ । #स्फुरदमंदानंदबहळ[११] ।
नित्यनिरस्ताखिलमळ[१२] । मूळभूत ।।५।।
जयजय देव स्वप्रभ[१३] । जगदंबुदगर्भनभ[१४] ।
भुवनोद्भवारंभस्तंभ[१५] । भवध्वंस[१६] ।।६।।
जयजय देव विशुद्ध[१७] । *अविद्योद्यानद्विरद[१८] ।
शमदममदनमदभेद[१९] । दयार्णव ।।७।।
जयजय देवैकरूप[२०] । अतिकृतकंदर्पसर्पदर्प[२१] ।
●भक्तभावभुवनदीप[२२] । तापापह[२३] ।।८।।
जयजय देव अद्वितीय । परिणतोपरमैकप्रिय[२४] ।
निजजनजित[२५] भजनीय । मायागम्य[२६] ।।९।।
जयजय देव श्रीगुरो । अकल्पनाख्यकल्पतरो[२७] ।
स्वसंविद्द्रुमबीजप्ररो[२८]–। हणावनी[२८] ।।१०।।
हें काय एकैक ऐसैसें । नानापरिभाषावशें[२९] ।
स्तोत्र करूं तुजोद्देशें[३०] । निर्विशेषा[३१] ।।११।।
जिहीं विशेषणीं विशेषिजे[३२] । तें दृश्य, नव्हे रूप तुझें, ।
हें जाणें, मी म्हणौनि लाजें । वानणा[३३] इहीं ।।१२।।
परी मर्यादेचा सागरु । हा तंवचि तया डगरु[३४] ।
जंव न देखे सुधाकरु । उदया आला ।।१३।।
सोमकांतु निजनिर्झरीं[३५] । चंद्रा ∆अर्घ्यादिक न करी ।
तें, तोचि, अवधारीं । करवी कीं, जी ।।१४।।

१ स्वभक्ताला सर्वथैव मंगलकारक. २ जन्मवार्धक्यादिरूपी मेघाच्या जाळ्याचा. ३ नाशकर्ता वायु.
४ विदलित=नाशिलीं आहेत, आसुरी संपत्ति, अमंगळाची=अकल्याणाचीं कुळें ज्यानें. ५ निगम=वेद व आगम = स्मृतिशास्त्रें, तद्रूप वृक्षाचे फळ देणारा.
६ विगतविषय=वैराग्यसंपन्न यांचा प्रिय सखा. ७ कृतांत उत्साहनाशक.
८ चंचल चित्ताच्या प्राशनानें दोंदिल.
९ जगास प्रकट करून त्यांत निरंतर.
१० क्रीडाप्रिय.
११ शांत अशा अत्यानंदाला स्फुरद्रूप करणारा असा. १२ पापांचा जेथें सर्वकाळ नाश आहे असा. १३ स्वयंप्रकाश. १४ जगद्रूप मेघाच्या आकाशा. १५ जगद्रूप उत्पत्तीचा मूळस्तंभ. १६ संसारनाशक. १७ उपाधिरहित, निर्मळ. १८ अविद्यारूप वनाचा नाश करणारा हत्ती. १९ काममदांचा शमदमेंकरून नाश करणारा. २० एकरूपच देव. २१ कामसर्पाच्या गर्वाचा तिरस्कार करणारा. २२ भक्तांच्या प्रेममंदिराचा दीप. २३ तापहर्ता. २४ परिपक्व आहे उपरम-शांति ज्यांस तोच एक ज्याला प्रिय.
२५ भक्ताधीन व भजनयोग्य असा. २६ मायेस अगम्य. २७ अकल्पित फळ देणारा कल्पवृक्ष. २८ स्वसंवेद्यज्ञानवृक्षाचें बीज रुजण्याचे स्थान. २९ अनेक प्रकारच्या भाषापद्धतीनें. ३० तुझ्या हेतूनें. ३१ ज्याला वेगळें कांहीं नाहीं अशा.
३२ स्तुति करावी. ३३ वर्णावयास.
३४ ख्याती, प्रसिद्धी.

३५ आपल्या अंगांतून पाझरलेल्या जलानें.

#स्फुरदानंदकंदल. *(१)विद्युद्यानद्विरद=ज्ञानोदयरूपी अरण्यांतील हत्ती. (२)अविद्योदय, (३)दयोद्यानारविंद.
● भक्तभावभवनदीप. ∆अर्घ्यादिक करी?